## राज्य ई गव्हर्नन्स कार्यक्रम ( १०० % राज्य पुरस्कृत)(कृषी आयुक्तालय स्तर )

**योजनेचा उद्देश :**

- कृषि विभागाच्या कामाकाजामधील संगणकीकरण
- कृषि तंत्रज्ञानचा विस्तार प्रचार व प्रसिद्धी
- कृषी विद्यापीठातील शास्त्रज्ञांचे संदेश, हवामानाचा अंदाज, कीड व रोग यावरील उपाययोजना इ बाबत माहितीचे प्रसारण
- नवीन आज्ञावली विकसन व देखभाल
- इंटरनेट सुविधा व सायबर सिक्युरिटी आवश्यक कार्यवाही
- कृषि विषयक आज्ञावलीचे क्लाऊड व्यवस्थापन
- संगणक व तद्अनुषंगीक उपकरणाचा पुरवठा

योजनेची व्याप्ती- संपुर्ण महाराष्ट्र राज्य
कार्यान्वयीन यंत्रणा - कृषि आयुक्तालय, पुणे

**योजनेमध्ये समाविष्ट माहिती तंत्रज्ञान विषय उपक्रम**

**एमकिसान एस एम एस सेवा:**

- कृषि विषयक हवामान सल्लागारपीट ,अतिवृष्टी चक्रीवादळ ,किडरोगांचा प्रादुर्भाव ,बाजारभाव इ, बाबत विशेष सल्ला नोंदणीकृत शेतक.यांना मोफत देण्यात येतो .
- राज्यातील एकूण १३२ लाख शेतकर्यापैकी नोंदणीकृत असलेल्या शेतक-यांची संख्या ६६.४९ लाख (५०%)
- महाराष्ट्र राज्य देशपातळीवर प्रथम क्रमांकावर आहे.

**महाअ‍ॅग्रीटेक:**

- आधुनिक तंत्रज्ञानाचा अधिकतम वापर करुन विशेषत: सॅटेलाईट इमेजिंग व ड्रोन तंत्रज्ञानाच्या सहाय्यानेपिकनिहाय क्षेत्राची अचूकगणना करणे, लागवड केलेल्या पिकांचे आरोग्य सर्वेक्षण करणे , पिकांचे काढणी- पश्चात येणाऱ्या उत्पादनाचे अनुमानकाढणे आणि प्रकल्पांतर्गत विकसित केलेल्या विविध संगणकीय प्रणाली परस्परांना जोडून माहिती एकत्रीकरणाद्वारे शेतक-यांसाठी अचूक सल्ला व मार्गदर्शन करणारे एकात्मिक संगणकीय व मोबाईल ॲप्लीकेशन प्रणाली तयार करणे हे या प्रकल्पाचे प्रमुख उद्देश आहेत.
- MRSAC ,नागपूर व NRSC, हैद्राबाद यांच्या सहकार्याने कृषि विभागाने महाअ‍ॅग्रीटेक हा प्रकल्प २०१९ मध्ये कार्यान्वित केला आहे .
- महाअ‍ॅग्रीटेक प्रकल्पांचे संकेतस्थळ- mrsac.maharashtra.gov.in/mahaagritech
- Mahaagritech प्रकल्पाबाबत स्वतंत्र वेब पोर्टल व mobile application तयार झाले असून यामध्ये जमीन आरोग्य पत्रिका ,CROPSAP ,MAHARAIN या आज्ञावाल्यांचे integration करण्यात आले आहे
- गाव निहाय जमीन सुपीकता निर्देशांक माहिती संकलनाचे काम संपूर्ण राज्यासाठी पूर्ण झालेले आहे. वापरकर्ता MahaAgriTech Geoportal वरून जमीन सुपीकता निर्देशांक नकाशे व सांख्यिकीय माहिती डाउनलोड करू शकतो.

### किसान कॉल सेंटर - टोल फ्री क्रमांक-१८०० १८० १५५१

- सुरुवात २१ जानेवारी २००४
- केंद्र शासनकडून सदर सेवा इफको किसान या कंपनीमार्फत महाराष्ट्र राज्यासाठी सुरु आहे.
- महाराष्ट्र आणि गोवाचे ऑफिस पुणे इथे कार्यरत आहे, ६५ कर्मचारी कार्यरत
- एकूण वर्षभरात (२०२०-२१) ८,५५,००० फोन शेतकऱ्यानं कडून पूर्ण महाराष्ट्रतुन येऊन गेलेत,
- शेतकरयांचे प्रश्न -हवामान अंदाज,सरकारी योजना,बाजार भाव,पीक,कीड आणि रोग व्यवस्थापन, पिकांच्या जाती,खत आणि पाणी व्यवस्थापन तण नियंत्रण,फळं बहार व्यवस्थापन, शेती मधील आधुनिक तंत्रज्ञान या बद्दल माहिती दिली जाते.
- कर्मचा-यांना डिपार्टमेंट ऑफ अग्रीकल्चर,ATMA आणि कृषी विद्यापीठ मार्फत वेळोवेळी हंगामी प्रशिक्षण पण दिली जाते.

### टोल फ्री कॉल सेंटर:

राज्य कृषि विभागाची शेतक-यांसाठी टोल फ्री क्रमांक .१८०० २३३ ४०००सेवा कार्यान्वित.या सेवेव्दारे शेतक-यांना खते ,बियाणे ,किटकनाशके यांचे पुरवठा व तक्रारीबाबतचे निराकरण मोफतकरण्यात येते, तसेच कृषिविषयक मार्गदर्शनही मोफत करण्यात येते. **टोल फ्री कॉल सेंटर** चे संनियंत्रण कृषी आयुक्तालय मार्फत केले जाते.

### महाडिबीटी पोर्टल

- महाराष्ट्र शासन कृषि विभागामार्फत योजनांचा लाभ घेण्यासाठी कृषि विभागामार्फत महाडीबीटी (MahaDBT) ही संगणकीय ऑनलाईन प्रणाली विकसित.
- महाडिबीटी पोर्टलवर https://mahadbtmahait.gov.in/ शेतकरी य़ोजना या सदराखाली जाऊन विविध लाभाच्या घटकांसाठी शेतकरी अर्ज करु शकतात.
- वैयक्तिक लाभार्थी/ शेतकरी यांच्या करीता योजना

| अ.क्र | योजनेचे नाव | योजने अंतर्गत लाभाच्या बाबी |
|---|---|---|
| १ | राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान (तृणधान्य, भरडधान्य, कडधान्य, गळीतधान्य, भात, कापूस, ऊस) | पिकनिहाय आधारित सिंचन साधने सुविधा व यंत्र व औजारे यासाठी लाभ दिला जातो. उदा. इलेक्ट्रीक मोटार, डिझेल इंजिन, पीव्हीसी पाईप्स, पेरणी यंत्र, बीबीएफ पेरणी यंत्र, मळणी यंत्र, तसेच बियाणे, पिक संरक्षण औषधे, सुक्ष्म मुलद्रव्ये इ. घटकांना लाभ दिला जातो. |
| २ | कृषि यांत्रिकीकरण उप-अभियान (Farm Submission) | विविध यंत्रे/औजारे घटकांकरीता विविध लाभ दिला जातो. उदा. रोटाव्हेटर, ट्रॅक्टर, पॉवर टिलर, नांगर, पेरणी यंत्र, BBF पेरणी यंत्र, मळणी यंत्र, प्लॅंटर, रिझर, पॉवर विडर, स्प्रेअर्स, रिपर व इतर यंत्र. |
| ३ | राज्य पुरस्कृत कृषि यांत्रिकीकरण योजना | |
| ४ | राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत कृषि यांत्रिकीकरण | |
| ५ | एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान | ट्रॅक्टर, पॉवर टिलर, हरितगृह, शेडनेट, कांदाचाळ, शेततळे अस्तरीकरण, प्लॅस्टिक मल्चिंग, क्षेत्रविस्तार घटक, पिक संरक्षण उपकरणे, काढणी पश्चात व्यवस्थापन (पॅक हाऊस, शीतगृह, रिफर व्हॅन, फिरते विक्री केंद्र व इ.) जुन्या फळबागांचे पुन:र्जीवन, आळंबी उत्पादन व नर्सरी. |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना (PMKSY) | ठिंबक व तुषार सिंचन संच साधनांचा लाभ देण्यात येतो. |
| ७ | SC/ST शेतक-यांसाठी वैयक्तिक लाभाच्या योजना<br>१) बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना<br>२) डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना | या योजनेंतर्गत नवीन विहीर बांधकाम, जुनी विहिर दुरुस्ती, इनवेल बोरिंग, पंपसंच, वीज जोडणी आकार, शेततळाचे प्लॅस्टिक अस्तरीकरण, सूक्ष्मसिंचन संच (ठिबक व तुषार), सोलर पंप |

२) शेतकरी गट/ शेतकरी कंपनी/शेतकरी संघ साठी कृषि विभागाच्या योजना

| अ.क्र | योजनेचे नाव | योजने अंतर्गत लाभाच्या बाबी |
|---|---|---|
| १ | कृषि यांत्रिकीकरण उपअभियान (कृषि औजारे बॅक स्थापना) | विविध यंत्रे/औजारे घटकांकरीता विविध लाभ दिला जातो. उदा. रोटाव्हेटर, ट्रॅक्टर, पॉवर टिलर, नांगर, पेरणी यंत्र, BBF पेरणी यंत्र, मळणी यंत्र, प्लॅटर, रिझर, पॉवर विडर, स्प्रेअर्स रिपर व इतर यंत्र |
| २ | एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान | पॉलीहाऊस, शेडनेट, हरितगृह, प्लॅस्टिक मल्चिंग, आळिबी उत्पादन, प्राथमिक प्रक्रिया केंद्र. नर्सरी, काढणी पश्चात व्यवस्थापन (कांदाचाळ, रेफरव्हॅन इ.) |

**महाडिबीटी फार्मर ॲप्लीकेशन व कागदपत्रे छाननी मोबाईल ॲप्लीकेशन**

- कागदपत्रे अपलोड करण्यासाठी शेतक-यांच्या सोई करिता MahaDBT Farmer Android App तसेच क्षेत्रिय स्तरावरील अधिकारी व कर्मचारी यांना कागदपत्रांची पडताळणी करण्याकरिता स्क्रुटिनी मोबाईल ॲप्लीकेशन उपलब्ध.
- पोर्टल वापरकर्तासाठी सोईस्कर (युजर फ्रेंडली) करण्याच्या दृष्टीने सातत्याने विकसन सुरु.
- पोर्टलवरील अडचणीचे निराकरण करणेकरिता कृषि विभागाचे हेल्पडेस्क क्रमांक ०२०-२६११११२६

**यु ट्यूब चॅनल** – https://www.youtube.com/c/agriculturedepartmentgom

कृषी विभागाचे स्वतंत्र यु ट्यूब चॅनल सुरु आहे. पिक व्यवस्थापन,बीज प्रक्रिया ,तसेच कृषी विषयक माहिती यु ट्यूबवर उपलब्ध करून देण्यात येते.

**कृषि विषयक Blogspot आणि Autoreply ची सुविधा**

- कृषि विभागाने कृषि विषयक योजनांच्या अद्यावत माहितीसाठी Blogspot तयार करण्यात आला आहे.
- सदर BlogSpot ची लिंक krushi-vibhag.blogspot.com आहे.
- कृषि विषयक योजनामध्ये योजनेची व्याप्ती, लाभार्थी निकष, अनुदान व अर्ज कुठे करावा याबाबत माहिती देण्यात आली आहे.
- कृषि विभागाच्या जवळपास २७ योजनांचा समावेश केला असून त्यात कृषि विभाग व जिल्हा परिषद यांच्यामार्फत राबिवण्यात येणा-या योजनांचाही समावेश करण्यात आला आहे व विविध योजनांची सविस्तर माहिती देण्यात आली आहे.

**कृषि विभाग** Whats app number – ८०१०५५०७८०

- कृषि विषयक योजनांची माहिती मिळवण्यासाठी ८०१०५५०७८० या Whatsapp क्रमांकावर नमस्कार किंवा Hello हा शब्द टाईप करुन पाठवल्यास आपणास स्वागत संदेश प्राप्त होतो.
- यामध्ये कृषि विभागाच्या प्रचलित योजनाबाबत संक्षिप्त शब्द दिले आहेत.उदा. Well, Mech, Hort इत्यादी टाईप करुन वरील क्रमांकावर पाठवल्यास आपणास पाहिजे असण्या-या योजनेची माहिती उपलब्ध होते.

**क्रॉपवॉच –**

- (URL – cropwatch.maharashtra.gov.in/cis/Login.jsp) शेतकरी /कृषि विभागातील कार्यरत यंत्रणेसाठी तालुकानिहाय, जिल्हा निहाय, विभाग निहाय पिक पेरणी अहवाल उपलब्ध आहेत. सदर अहवाल दर आठवड्याला अपडेट करण्यात येतो.
- हंगामातील आठवडानिहाय पिक लागवडीखालील क्षेत्राची ऑनलाईन माहितीसाठी ही प्रणाली वापरली जाते. यामध्ये कृषि विभागामार्फत तालुकानिहाय लागवड क्षेत्राची माहिती/आकडेवारी संकलित केली जाते. त्यानुसार जिल्हा/तालुका/विभाग/राज्य निहाय पिक निहाय लागवडीचे क्षेत्र, मागील वर्ष व सरासरी तुलनात्मक आकडेवारी अहवाल संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**क्रॉपसॅप**

URL: https://cropsap.maharashtra.gov.in/हे वेब पोर्टल व मोबाईल ॲप्लीकेशन असून शेतक-यांना कृषी विद्यापीठे/शास्त्रज्ञांनी जारी केलेल्या सूचना आणि सर्व सल्ले क्रॉपसॅपच्या वेबपोर्टलवर सार्वजनिक डोमेनवर वर पिकनिहाय,जिल्हानिहाय किड रोग पातळी व व्यवस्थापनाचे सल्ले (advisory) वेळोवेळी Publish केले जातात.

- पिकावरील किड अथवा रोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्प (क्रॉपसॅप) अंतर्गत पिकाचे सर्वेक्षण करुन किड अथवा रोगांच्या प्रादुर्भावाबाबत शेतक-यांना उपाय योजना व सल्ला मोबाईलवर एसएमएसद्वारे पाठविला जातो, त्यासाठी केंद्र पुरस्कृत किसान एसएमएस सेवेचा वापर केला जात आहे.
- क्रॉपसॅप योजनेंतर्गत खालील ८ पिकांसाठी कीड व रोग निरीक्षण डेटा कॅप्चर केला जातो.
- पिके -कापूस,भात,तूर,सोयाबीन,मका,ज्वारी,ऊस,हरभरा .
- दरवर्षी क्रॉपसॅप योजना १ जुलैपासून सुरू होते
- हा डेटा ईटीएल आणि जवळील ईटीएल गावे / पीकनिहाय किड अथवा रोगांच्या प्रादुर्भावाबाबत आक्रमणाचे विश्लेषण करण्यास मदत

**पर्जन्यमापन आणि विश्लेषण – (maharain.maharashtra.gov.in )**

- सदरचा प्रकल्प हा एसएमएसद्वारे दैनंदिन पावसाची आकडेवारी संकलित करून जनतेला माहिती उपलब्ध करून देण्यासाठी असून यामध्ये राज्यातील २०६५ महसूल मंडळांची पर्जन्यविषयक नोंदी तथा सरासरी व मागील वर्षाची तुलनात्मक माहिती पाहता येते. प्रत्येक महसूल मंडळात पर्जन्यमापक यंत्र बसविले असून राज्यातील २०६५ राजस्व मंडळ अधिकारी पावसाची नोंद घेऊन एमएसद्वारे माहिती पाठवितात.
- सन १९९७ पासूनची अद्यावत माहिती **maharain.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर ऑनलाईन उपलब्ध असून ती तुलनात्मक स्वरुपात भौगोलिक माहिती प्रणाली नकाशाद्वारे (GIS maps) राज्य, जिल्हा व तालुकानिहाय उपलब्ध आहे. विभागनिहाय राज्याचा नकाशा व मंडळ निहाय सर्व जिल्ह्यांच्या नकाशाद्वारे पावसाच्या तीव्रतेनुसार वेगवेगळ्या रंगनिर्देशकाप्रमाणे माहिती मिळते.

- महारेन पोर्टलवरील माहिती स्टेट डाटा बँक पोर्टलवर (https://mahasdb.maharashtra.gov.in) सुध्दा उपलब्ध आहे.
- पर्जन्यमापन व विश्लेषण या प्रणालीस Skoch Order of Merit २०१४ पारितोषिक देवून गौरविण्यात आले आहेत.

**ई-परवाना:- कृषि निविष्ठा परवाना व्यवस्थापन**

राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय  खते बियाणे व औषधे यांच्या परवाना वितरण साठी महा परवाना अंतर्गत नवीन इ परवाना संगणकीय प्रणाली विकसित करण्यात आली आहे.सदर सुविधा आपले सरकार पोर्टल वर उपलब्ध आहे .
महा परवाना विषय संकेतस्थळ mahaparwana.mahait.org

**कृषि संकेतस्थळ-**

सदर संकेतस्थळावर कृषि विषयक विविध योजनांच्या मार्गदर्शक सूचना तसेच पिक व्यवस्थापन, एकात्मिक किड रोग नियंत्रण इत्यादीबाबत माहिती दिली जाते. (http://krishi.maharashtra.gov.in)

**ई-ठिबक**

- सदर संगणकीय प्रणाली NIC द्वारे विकसित केली असून २०१२-१३ पासून कार्यरत
- URL: http://१.६.१२५.७८/mahdrip/ethibak/index.php
- प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना ही केंद्र पुरस्कृत योजना भारत शासनामार्फत राबविण्यात येत आहे.
- योजनेतील भागधारक लाभार्थी शेतकरी, उत्पादक कंपनी, वितरक व महाराष्ट्र शासन
- सदर ॲप्लीकेशनवर लाभ मिळालेल्या शेतक-यांना मागील ७ वर्षाचा legacy data उपलब्ध आहे.
- प्रधानमंत्री कृषि सिंचन योजने अंतर्गत सिंचन सुविधांसाठी महाडिबीटी पोर्टलवर विकसन करण्यात आले आहे.

**ई-साईल ३.००**

- **महाराष्ट्र राज्य सरकारने स्थापन केलेल्या मृदा चाचणी प्रयोगशाळांमध्ये मृदा चाचणी ही सर्वात महत्त्वाची सेवा आहे**
- ऑफलाईन डेस्कटॉप ॲप्लीकेशन, NIC मार्फत विकसित
- राज्यातील ३१ जिल्ह्यामधील एकूण २१४ शासकीय मृद व पाणी तपासणी प्रयोगशाळेमध्ये सदर सॉफ्टवेअर कार्यरत
- भागधारक- शेतकरी, उत्पादक कंपन्या, शासकीय संस्था, अशासकीय संस्था
- माती नमुन्यातील २१ घटक तपासले जातात. विश्लेषण परिणामांवर आधारित, शेतकऱ्यांना सॉइल हेल्थ कार्ड (SHC) वितरीत केले जाते
- सन २०२१-२२ मधील जमिन आरोग्य पत्रिकेचा डाटा महाॲग्रीटेक प्रकल्पांतर्गत जिओ पोर्टलवर अपलोड करण्याची कार्यवाही सुरु आहे. (महाॲग्रीटेक प्रकल्पांचे संकेतस्थळ - mrsac.maharashtra.gov.in/mahaagritech)

**महाकृषी मोबाईल ॲप्लिकेशन व वेब पोर्टल**

- कृषि विभागातील क्षेत्रिय अधिकारी आणि संबंधित क्षेत्रातील भाग धारकांसाठी एकच व्यासपीठ तयार करणे हे कृषी विभागाचे ध्येय असून विभागाने **महाकृषी** व्यासपीठाचे विकसन हाती घेतले आहे.
- महाकृषि या मोबाईल व वेब ॲप्लीकेशनचे URL uatmahakrushi.mahaitgov.in/krishi-backend/user/login वर होस्ट करण्यात आले आहे.
- महाकृषी मोबाईल ॲप्लिकेशन व वेब पोर्टल हे क्षेत्रीय स्तरावरील अधिकारी/कर्मचारी यांच्या कामाची व एकंदरीत कृषि विषयक माहिती संकलित करण्यासाठी विकसित करण्यात येत आहे.या प्लॅटफॉर्मद्वारे कृषीविभागातील पदानुक्रम डिजिटल केला जाणार आहे.
  विभाग, जिल्हा, उपविभाग, तालुका, मंडळ, सजा, गाव आणि त्याचप्रमाणे प्रत्येक ठिकाणचे संबंधित क्षेत्रीय अधिकारी ऑन बोर्ड केले जात आहेत.

**महाकृषी ॲप्लिकेशन मध्ये समाविष्ट असलेली मॉड्यूल.**

- ऑफिसर्स मॅपिंग
- लोकेशन मॅपिंग
- ऑर्चर्ड मॅपिंग
- शेतकरी शेतीशाळा (एफ एफ एस)
- प्रशिक्षण मोड्यूल